दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. २२ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ९२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## चार धाम यात्रा तात्पुरत्या स्थगितीनंतर पुन्हा सुरू

**नवी दिल्ली :** यात्रेच्या मार्गांचा सखोल आढावा घेतल्यानंतर, २० जुलै रोजी सुरक्षेचा उपाय म्हणून तात्पुरती स्थगित केलेली 'चार धाम यात्रा' आता सुरळीतपणे पुन्हा सुरू झाली आहे. गढ़वाल आयुक्त आनंद स्वरूप यांनी सांगितले की, सर्व चार धाम जिल्ह्यांमध्ये जिल्हा प्रशासन, पोलीस, एसडीआरएफ आणि इतर संबंधित विभागांच्या समन्वयाने ही यात्रा सुरू आहे. यात्रेच्या मार्गांवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून, संवेदनशील भागांमध्ये विशेष सतर्कता बाळगली जात आहे, असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

## राज्यात पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाचे स्वरूप विस्कळीत राहिले होते. मात्र आता राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबई, कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार २१ जुलै ते २६ जुलैदरम्यान कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात वार्ता

### रशियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात 4 भारतीय खलाशांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** युक्रेनच्या किनारपट्टीजवळील व्यापारी मालवाहू जहाजावर झालेल्या रशियन हल्ल्यात चार भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याने भारताने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या गंभीर घटनेनंतर केंद्र सरकारने भारतातील रशियाचे प्रभारी राजदूत व्लादिमीर लदानोव्ह यांना समन्स बजावत अधिकृत निषेध नोंदवला असून, या हल्ल्याबाबत स्पष्टीकरणही मागितले आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने या घटनेला अत्यंत गंभीर मानत निष्पाप भारतीय नागरिकांच्या मृत्यूबाबत चिंता व्यक्त केली आहे. भारताने या हल्ल्याची कठोर शब्दांत निंदा करत दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. माहितीनुसार, १९ जुलै रोजी संध्याकाळी युक्रेनमधील ओडेसा बंदरातून रवाना होत असलेल्या 'एमव्ही गोल्डन लिओ' या गिनी-बिसाऊच्या ध्वजाखालील मालवाहू जहाजावर क्षेपणास्त्र हल्ला झाला. धान्याची वाहतूक करणाऱ्या या जहाजावर एकूण १७ क्रू सदस्य होते, त्यापैकी पाच भारतीय होते.

### कैदेत असल्यासारखे अडकलो होतो : खासदार कंगना रनौत

**नवी दिल्ली :** सोमवारी सकाळी दिल्लीच्या मध्यभागी हजारो आंदोलकांनी संसदेच्या दिशेने मोर्चा वळवला. हा मोर्चा पूर्वपरवानगीशिवाय काढण्यात आला होता. काही वेळातच या आंदोलनाला अत्यंत हिंसक वळण लागले. बॅरिकेड्स तोडून पुढे जाणाऱ्या या प्रचंड जनसमुदायाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. अचानक उसळलेल्या या गोंधळामुळे राजधानी दिल्लीतील जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले. मान्सून अधिवेशनासाठी संसदेत उपस्थित असलेल्या भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना रनौत यांनी या घटनेवर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी कंगना रनौत यांनी संसदेतील भयावह स्थितीचे वर्णन केले. त्या म्हणाल्या, "आम्ही सर्वजण खूप घाबरलो होतो. संसदेचे दरवाजेही बंद करण्यात आले होते आणि आम्ही सर्व खासदार आतच कैदेत असल्यासारखे अडकून पडलो होतो. जमाव ज्या आक्रमकतेने पुढे येत होता, ते पाहून एका क्षणी आम्हाला वाटले की आता ते थेट आमच्यावरच हल्ला करतील. आमच्या मनात प्रचंड भीती निर्माण झाली होती."

### अत्याचार आणि हत्या प्रकरण; मुख्यमंत्र्यांचे जलदगती खटला चालवण्याचे निर्देश

मुंबई : वर्धा जिल्ह्यातील रोठा गावात घडलेली १२ वर्षीय मुलीवरील अत्यंत अमानुष क्रूरता आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण समाज हादरला असून, पीडित कुटुंबाला त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी आणि नराधमांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री तथा गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीदरम्यान पालकमंत्री पंकज भोयर यांनी या खटल्याची सुनावणी विशेष न्यायालयात जलदगतीने चालवली जावी आणि या प्रकरणात विशेष सरकारी वकील नियुक्त करण्यात यावा, अशी ठाम मागणी केली. मुलींच्या सुरक्षेबाबत सरकारकडून कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची अत्यंत गंभीर दखल घेतली असून, कायदा आणि न्यायपालिका विभागाच्या सचिवांना विनाविलंब योग्य कारवाई करण्याचे तात्काळ निर्देश दिले आहेत. पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि आरोपींना कठोरतम शिक्षा सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकार पूर्णपणे कटिबद्ध आहे.

## "शाल जोडे"




# जर पोलिसांनी कंट्रोल घेतला नसता तर अनेक अनावश्यक गोष्टी घडल्या असत्या : देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावर पोलिसांनी केलेला लाठीमार हा परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी गरजेचा होता. तसे केले नसते तर काही अनावश्यक गोष्टी घडल्या असत्या, असे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांना आहे. पण आंदोलन करताना संविधानाने दिलेले हक्क आणि जबाबदारी या दोन्ही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. दिल्लीत सुरु असलेले विद्यार्थी आंदोलन चेहरा नसलेले आहे. त्यामुळे या आंदोलनात काही लोक वेगळा अजेंडा घेऊन घुसले आहेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. ते मंगळवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

कोणीही परवानगी घेऊन आंदोलन करत असेल, शांतीपूर्ण आंदोलन करत असेल तर त्याला परवानगी दिली जाईल. मात्र, जाणीवपूर्वक राजकीय अशांतता तयार करण्यासाठी विनापरवानगी आंदोलन करणे, हिंसा करणे, हे कुठल्याही परिस्थितीत योग्य नाही, त्याच्यावर आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. दिल्लीत आंदोलन झाले, त्यामध्ये अनेक राजकीय पक्ष आपली पोळी कशी भाजता येईल हा प्रयत्न करत आहेत. अनेक संघटना, ज्यांचं या विषयाशी घेणेदेणे नाही, ते अराजकता निर्माण कशी होईल, त्याचे प्रयत्न करत आहेत. ज्यावेळी फेसलेस आंदोलन असतं, दिल्लीत नेतृत्त्वहीन व्यवस्था पाहायला मिळाली, पोलिसांच्या गाड्या उलटवणे, फोडणे असेल, पोलिसांवर दगडफेक असेल, अशा अनेक गोष्टी घडल्या. एक गोष्ट सांगतो, कुठल्याही सरकारला आपल्या नागरिकांवर लाठीचार्ज करणं कधीच आवडत नाही. पण काल ज्याप्रकारची अवस्था होती, जर पोलिसांनी कंट्रोल घेतला नसता तर अनेक अनावश्यक गोष्टी घडल्या असत्या. पोलिसांनी मोठा संयमही दाखवला आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

एक गोष्ट निश्चित आहे की, कुठलंही आंदोलन आपण बघितलं, फेसलेस असतं आंदोलन तेव्हा काही प्रवृत्ती त्यामध्ये शिरत असतात. त्या प्रवृत्ती आंदोलनाचा फायदा घेऊन, आंदोलकांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला स्वार्थ कसा पूर्ण करता येईल, असा प्रयत्न करत असतात. यापैकी अनेकांना नीट परीक्षा काय आहे, परीक्षा कधी झाली, हे माहिती नाही. ते ते आपला अजेंडा रेटत आहेत. सगळे काही एका विचाराने तिथे एकत्र आलेले नाहीत. या आंदोलनात काही हौशे-नवशे, गौशे आपला अजेंडा पूर्ण करत आहेत. मी सगळ्याच आंदोलकांवर आरोप करु इच्छित नाही. या आंदोलनात काही लोक चांगल्या भावनेने सहभागी झाले असतील. पण निश्चितच या आंदोलनात काही असे लोक घुसलेत ज्यांना आपला स्वार्थ साधायचा आहे. ज्यांचं नीट परीक्षेशी घेणंदणं नाही, केवळ अराजकता निर्माण करायची आहे, असे लोक आपला अजेंडा घेऊन या आंदोलनात शिरले आहेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच काही राजकीय पक्ष ज्यांना त्या त्या राज्यात रिजेक्ट केले आहे, ते यातून आपल्याला पुन्हा काहीतरी मिळवता येईल का, असा प्रयत्न करत आहेत, असा टोलाही त्यांनी विरोधकांनी हाणला.

## 'राजकीय आंदोलनांना सोशल मीडियावर पाठिंबा देऊ नका'; IIT च्यामोठ्या निर्णयाची देशभरात चर्चा

**रुडकी :** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) रुडकीने विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी जारी केलेल्या एका अंतर्गत सर्क्युलरमुळे मोठी चर्चा रंगली आहे. या सर्क्युलरमध्ये सोशल मीडियावर कोणत्याही राजकीय आंदोलनाला किंवा राजकीय भूमिकेला पाठिंबा दर्शवू नये, तसेच सार्वजनिक राजकीय वक्तव्ये करण्यापासून दूर राहावे, असा सल्ला देण्यात आला आहे. हे सर्क्युलर सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अनेकांनी त्यावर टीका केली असून काहींनी याला 'तोंड बंद करण्याचा आदेश' असेही म्हटले आहे.

**विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर सर्क्युलर :**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर देशातील विविध भागांतही विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. या पार्श्वभूमीवर IIT रुडकी प्रशासनाने विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी अंतर्गत सूचना जारी केल्या. त्यामध्ये संस्थेशी संबंधित कोणत्याही व्यक्तीने सोशल मीडिया किंवा इतर सार्वजनिक व्यासपीठांवर राजकीय भूमिका मांडू नये किंवा कोणत्याही राजकीय आंदोलनाला पाठिंबा दर्शवू नये, असे नमूद करण्यात आले आहे.

**'इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे वक्तव्य आचारसंहितेच्या विरोधात' :**

सर्क्युलरमध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, काही विद्यार्थी आणि कर्मचारी इंस्टाग्राम, फेसबुकसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सध्याच्या राजकीय आंदोलनांबाबत सार्वजनिक भूमिका आणि टीका करत असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रशासनाने स्पष्ट केले की, IIT ही शैक्षणिक आणि संशोधन संस्था असून विद्यार्थ्यांचे प्रवेश आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती अभियांत्रिकी, विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रातील ज्ञानवृद्धीसाठी केली जाते.

## मांड्या अन् म्हैसूरमध्ये सापडल्या रावणाच्या 35 प्राचीन मूर्ती

**म्हैसूर :** भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणच्या (ASI) अलीकडील संशोधनाने इतिहासकारांना आणि संशोधकांना आश्चर्याच्या गर्तेत ढकलले आहे. कर्नाटकातील मांड्या आणि म्हैसूर जिल्ह्यांमध्ये सुरू असलेल्या उत्खनन व संशोधनादरम्यान रावणाच्या ३५ हून अधिक प्राचीन मूर्ती सापडल्या आहेत. विशेष म्हणजे, ज्या भागात रामायण आणि महाभारताची पाळेमुळे जोडलेली आहेत, त्याच ठिकाणी रावणाच्या मूर्ती मोठ्या प्रमाणावर मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

**पुरातत्त्वीय संशोधनातील मोठे खुलासे :**


**ASI ची कारवाई:** वृत्तानुसार, ASI ला मद्दूर, मलावल्ली आणि मांड्या तालुक्यांत उत्खनन करताना रावणाच्या सुमारे १५ ते २० मूर्ती सापडल्या आहेत.

**स्वतंत्र संशोधन:** प्राचीन इतिहास व पुरातत्त्व अभ्यासक प्राध्यापक एन.एस. रंगराजू यांनी स्वतंत्र संशोधनादरम्यान मलावल्ली, बन्नूर आणि टी. नरसीपुरा येथून आणखी १५ ते २० प्राचीन मूर्ती शोधून काढल्या आहेत. ज्या मांड्या क्षेत्रातील 'मुथथी' परिसर पौराणिकदृष्ट्या भगवान राम, माता सीता आणि रामायण काळाशी जोडलेला मानला जातो,

आणि जवळच असलेले पांडवपुरा व कुंती बेट्टा महाभारतातील पांडवांशी संबंधित आहेत त्याच पवित्र भूमीत रावणाच्या मूर्ती मिळणे अत्यंत रंजक मानले जात आहे. इतिहासकारांच्या मते, शतकांपूर्वी या प्रादेशिक भागात रावणाबाबत मोठा आदर असणारी आणि त्याची पूजा करणारी एक वेगळी सांस्कृतिक परंपरा अस्तित्वात असावी. दक्षिण भारताच्या अनेक प्रादेशिक परंपरांमध्ये रावणाची अफाट बुद्धिमत्ता, वेदांचे सखोल ज्ञान आणि संगीत कलेबद्दल त्याचा नितांत आदर केला जात असल्याचा हा पुरावा मानला जात आहे.

## बीड बायपासवर भरधाव अन् मद्यधुंद रिक्षाचालकाची महिलेला जोरदार धडक
### गंभीर जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील बीड बायपास रस्त्यावरील निशांत पार्क परिसरात आज दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास एक अत्यंत दुर्दैवी आणि भीषण अपघाताची घटना घडली. एका भरधाव आणि मद्यधुंद रिक्षाचालकाने दिलेल्या जोरदार धडकेत निता रामजी गवळे (वय ४३ वर्ष, रा. रमानगर) या महिलेचा करुण अंत झाला. मिळालेल्या माहितीनुसार, रमानगर येथील रहिवासी असलेल्या निता गवळे या दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास निशांत पार्क परिसराच्या बाजूने जात असताना, (क्र. MH20EK7543) या क्रमांकाच्या ऑटो रिक्षाचा चालक अशोक भाऊसाहेब ढाकणे (वय ३५) याने आपल्या ताब्यातील रिक्षा अत्यंत बेजबाबदारपणे आणि अतिवेगात चालवून त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की निता गवळे या रस्त्यावर फेकल्या गेल्या आणि गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी महिलेला उपचारासाठी पहिल्यांदा जवळच असलेल्या बजाज हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अधिक उपचारासाठी घाटी रुग्णालयाच्या अपघात विभागात हलवण्यात आले.

मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्यांना दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. दरम्यान, प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, रिक्षाचालक अशोक ढाकणे हा अपघाताच्या वेळी दारूच्या नशेत धुंद होता. त्याच्या अतिवेग आणि बेजबाबदारपणे वाहन चालवण्यामुळेच हा निष्पाप महिलेचा जीव गेला, असा आरोप स्थानिक प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. या घटनेबाबत सातारा पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलीस पुढील अधिक तपास करत आहेत. बेजबाबदार रिक्षाचालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## परभणी शहरात 110 कोटीच्या विकास कामांना मंजुरी
### खासदार संजय जाधव यांच्या पाठ पुराव्याला यश; पहिल्या टप्प्यात मनपासाठी वीस कोटी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी:** शहरातील विविध विकास कामासाठी उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे 110 कोटीच्या निधीस मंजुरी दिली व महानगरपालिकेच्या विकासासाठी वीस कोटीचा निधी चा शासन निर्णय आला आहे खा. संजय जाधव यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे

परभणी शहरातील महापालिका क्षेत्रात मूलभूत सोयी आणि सुविधांच्या विकासासाठी 20 कोटी चा पहिला नटराज रंग मंदिराच्या नवीन बांधकामासाठी 30 कोटी रुपये परभणी महापालिकेच्या प्रशासकीय इमारत बांधकामासाठी 60 कोटी रुपये असा एकूण 110 कोटी रुपयांचा विकास कामाचा नगर विकास विभागाने महापालिका क्षेत्रात मूलभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत निधी दिला आहे यातून शहरातील विविध प्रभागात रस्ते नाल्या पतदिव्यव इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत त्याचबरोबर महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे यांनी शहरात समांतर पाणीपुरवठा योजना भूमिगत गटार योजनेचे नवीन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचा ठराव घेतला होता या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे आणि मंजुरी दिली आहे या अगोदर योजनेत समांतर पाणीपुरवठा साठी 150 कोटी आणि भूमिगत गटारासाठी 450 कोटीचा निधी दिला होता त्यानंतर शहराच्या वाढीव भागाचा प्रस्ताव चा समावेश करून नवीन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला त्यानुसार समांतर पाणीपुरवठ्याच्या 250 कोटी आणि भूमिगत गटाराच्या जवळपास 574 कोटी रुपयांच्या नवीन प्रस्तावास मंजुरी मिळेल असे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिले

शहराचा विकास हेच माझे ध्येय परभणी शहरातील सर्वांगीण विकास आणि नियोजनबद्ध विकास हेच माझे ध्येय आहे नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत असून वीस कोटीचा निधी आला असून उर्वरित निधीलाही सतत पाठपुरावा सुरू राहील पाणीपुरवठा भूमिकेत गटाच्या वाढीव प्रस्तावानंतर मंजुरी मिळाली आहे विस्तार लक्षात घेऊन ही योजना राबविण्यात येणार असल्याचे असे प्रतिपादन खासदार संजय उर्फ बंडू जाधव यांनी केले

## अपहरण करून मारहाण करणाऱ्या तिघांना 12 तासांत अटक
### देवगाव रंगारीतून महिंद्रा थारसह आरोपी जेरबंद; मुख्य सूत्रधारासह तिघांचा शोध सुरू

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सेव्हन हिल उड्डाणपुलाखालून युवकाचे अपहरण करून देवगाव रंगारी येथे नेऊन लाकडी दांड्याने अमानुष मारहाण केल्याप्रकरणी जवाहरनगर पोलिस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या 12 तासांत संयुक्त कारवाई करत तीन आरोपींना अटक केली. या कारवाईत गुन्ह्यात वापरण्यात आलेली काळ्या रंगाची महिंद्रा थार कारही जप्त करण्यात आली असून मुख्य आरोपीसह अन्य तिघांचा शोध सुरू आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फकीरचंद उर्फ मनीष शामसिंग महेर (वय 29, मूळ रा. पेंढापूर, ता. गंगापूर, सध्या अजबनगर, क्रांती चौक) यांनी जवाहरनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. रविवारी (20 जुलै) रात्री साडेनऊच्या सुमारास ते रिक्षाने सिडको पुलावरून क्रांती चौकाकडे जात असताना सेव्हन हिल पुलाखाली महानगरपालिका बसथांब्याजवळ मोटारसायकलवर आलेल्या दोघांनी रिक्षा अडवून त्यांना जबरदस्तीने खाली उतरविले. त्याचवेळी काळ्या रंगाच्या महिंद्रा थारमधून आलेल्या आरोपींनी त्यांचे अपहरण करून देवगाव रंगारी येथे नेले.

तेथे 30 ते 40 ट्रक वाळू विक्रीतील कमिशनच्या वादातून आरोपींनी फिर्यादीला लाकडी दांड्याने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यानंतर त्यांचे कपडे फाडून मोबाईलवर व्हिडिओ चित्रित केला आणि तो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या तक्रारीवरून जवाहरनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या नेतृत्वाखाली जवाहरनगर पोलिस व गुन्हे शाखेच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. देवगाव रंगारी येथे छापा टाकून जाफर उर्फ गुड्डू अयुब शेख (33), जावेद अमिन शेख (20) आणि अनस अयुब चाऊस (18) यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली महिंद्रा थार कारही जप्त करण्यात आली. दरम्यान, मुख्य आरोपी उदय मोतीलाल मरमट उर्फ राजपूत (रा. झोलेगाव फाटा, ता. वैजापूर) तसेच मोटारसायकलवरील दोन अनोळखी साथीदार अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपआयुक्त रत्नाकर नवले, सहाय्यक पोलीस आयुक्त मनीष कल्याणकर, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक भंडारे, जवाहरनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन कुंभार तसेच देवगाव रंगारीचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## प्रशासकीय मध्यवर्ती इमारतीतील स्वच्छता आणि आरोग्याप्रती दाखवलेली तत्परता

राज्याचे प्रशासकीय केंद्र असलेल्या मंत्रालयातील पाणीपुरवठ्याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) तातडीने पावले उचलून आवश्यक उपाययोजना राबवणे, ही अत्यंत प्रशासकीय जबाबदारीची बाब आहे. राज्याचा कारभार जिथून चालतो, त्या इमारतीतील पाण्याच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे ही गंभीर बाब होती. मात्र, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) प्रयोगशाळेच्या अहवालातून मंत्रालयातील पाणी पिण्यास पूर्णपणे सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे या वादावर अखेर पडदा पडला आहे. माध्यमांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची तातडीने दखल घेऊन प्रशासनाने दाखवलेली ही तत्परता कौतुकास्पद असली, तरी अशा महत्त्वाच्या ठिकाणी आरोग्यदायी वातावरणासाठी प्रसारमाध्यमांच्या वृत्तांची वाट का पाहावी लागते, हा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित होतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने मंत्रालयातील जमिनीखालील मुख्य टाकीसह दोन्ही इमारतींवरील एकूण ३० पाण्याच्या टाक्यांची संपूर्ण साफसफाई केली आहे. यापुढे दर १५ दिवसांनी या टाक्यांची नियमित स्वच्छता करण्याचा घेतलेला निर्णय हा आरोग्यदायी दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. याशिवाय इमारतींमधील ३३ वॉटर प्युरिफायरचे सर्व्हिसिंग पूर्ण करणे आणि ८८ प्रसाधनगृहांच्या रोजच्या स्वच्छतेवर बारकाईने लक्ष ठेवणे, यामुळे कर्मचाऱ्यांचा आणि तेथे दररोज येणाऱ्या हजारो नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढण्यास मदत होईल. महापालिकेच्या प्रयोगशाळेने २९ एप्रिल आणि १० जुलै रोजी घेतलेल्या नमुन्यांच्या आधारे पाण्याचे शुद्धत्व प्रमाणित केले आहे, ज्यामुळे पाण्याबाबत पसरलेला संभ्रम आता पूर्णपणे दूर झाला आहे. या संपूर्ण प्रकरणात मुख्य सचिवांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्वतंत्र तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने प्रत्येक मजल्यावरील पाण्याचे नमुने संकलित केले असून त्यांचा अंतिम अहवाल लवकरच येणार आहे. अशा प्रकारची स्वतंत्र तपासणी प्रशासनातील पारदर्शकता अधिक बळकट करते. सरकारी कार्यालये ही स्वच्छतेच्या आणि उत्तम नागरी सुविधांच्या बाबतीत आदर्शनिर्मिती करणारी असावीत. मंत्रालयात राबवण्यात आलेल्या या स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या मोहिमेचा आदर्श घेत राज्यातील इतरही शासकीय कार्यालयांमध्ये अशीच स्वच्छता, सुरक्षित पाणीपुरवठा आणि आरोग्यदायी वातावरण कायम राखले जावे, हीच जनतेची अपेक्षा आहे.

# दादांविना राजकारण नीरस...



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री नामदार अजितदादा पवार हे नावाप्रमाणेच आम्हा सर्वांचे खऱ्या अर्थाने दादा होते. एक मित्र, एक भाऊ, एक नेता अशा विविध रूपांमध्ये आम्ही सर्वांनीच त्यांना अनुभवले आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र एका चांगल्या प्रशासकाला व जनतेविषयी प्रचंड आस्था आणि तळमळ असलेल्या एका दूरदृष्टी असणाऱ्या प्रगल्भ नेत्याला कायमचा मुकला आहे. सर्वच महाराष्ट्रावर हा आघातच इतका प्रचंड आहे की, या दुःखातून आपल्यासारखे कार्यकर्ते सावरूच शकत नाहीत.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख नामदार अजितदादा पवार यांचे निधन ही माझ्या आजवरच्या राजकीय आयुष्यातील सर्वांत वेदनादायी घटना आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या राजकारणात आम्ही एकत्रितपणे वाटचाल करत आलो. दादांच्या झंझावाताने राज्याच्या राजकारणाला नवी दिशा दिली. हजारो कार्यकर्त्यांना दादांनी पाठबळ दिले. आमच्यासारख्या अनेक नेत्यांना सोबत घेऊन राज्याच्या विकासाचा गाडा तडफेने पुढे नेला. आपल्या अभ्यासपूर्ण, काम आणि शिस्तबद्ध कार्यशैलीने दादांनी एक अवीट ठसा राज्याच्या राजकारण, समाजकारणावर उमटवला आहे. दादांनी केवळ राजकीय वारसा चालवला नाही, तर आपल्या धडाडीच्या कार्यातून तो अधिक बळकट केला. आदरणीय शरद पवारसाहेबांसारख्या कर्तृत्ववान नेत्यांचा वारसा लाभला असला तरीही केवळ त्या आधारावरच त्यांनी आपली वाटचाल केली नाही. प्रत्येक टप्प्यावर आपल्या कार्यकर्तृत्वाचा आणि कामगिरीचा ठसा उमटवत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली.

महायुतीच्या सरकारमध्ये अजितदादांचं स्थान अत्यंत महत्त्वाचं होतं. गेल्या २५ वर्षांत उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, जलसंपदा मंत्री या महत्त्वाच्या खात्यांमध्ये काम करताना जनतेच्या गरजा लक्षात घेऊन दादांनी अनेक दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या कार्यपद्धतीत वेग, अचूकता आणि शिस्त या तीन गोष्टी विशेषपणे जाणवत. कोणत्याही प्रकरणाचा खोलवर अभ्यास करून, त्याचे फायदे-तोटे समजून घेतल्याशिवाय ते निर्णय घेत नसत. कामात गती, निर्णयात स्पष्टता आणि अंमलबजावणीत काटेकोरपणा हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य राहिले.

अजितदादांचा सहकार क्षेत्रातला अनुभव दांडगा होता. त्यांनी पुणे जिल्ह्यात बारामतीच्या विकासातून एक मॉडेल उभं केलं. या भागात त्यांनी शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, उद्योग अशा अनेक क्षेत्रांचा विकास साधला. त्यांच्या कार्यामुळे बारामतीचा विकास हा आज ग्रामीण भागातील एक 'आदर्श' मानला जातो.

राज्याच्या राजकारणात, समाजकारणात, अर्थकारणात, शैक्षणिक क्षेत्रात, क्रीडाक्षेत्रात त्यांच्या दूरदृष्टीचं मोठं योगदान राहिलं. राज्याच्या विकासासाठी महायुती सरकारची वाटचाल अत्यंत वेगाने, जोमाने आणि एकजुटीने सुरू आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या मिशनमध्ये आम्ही सर्वजण झपाट्याने कार्यरत आहोत. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वन ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आमच्या सरकारने ठेवले असून त्यादृष्टीने अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून अजितदादांनी अनेक नव्या संकल्पांची, योजनांची आखणी सुरू केली होती. असे असताना एकाएकी दादा हा सर्व डाव अर्ध्यावर सोडून गेले आहेत.

अर्थसंकल्प आणि अजितदादा हे एक समीकरणच बनले होते. गतवर्षाच्या अर्थसंकल्पातून त्यांनी या व्हिजनला अनुसरून अत्यंत कौशल्यपूर्ण नियोजन करून समाजातील सर्व घटकांना न्याय व विकासाच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. 'लाडकी बहीण योजना' ही महायुती सरकारचा मानबिंदू ठरली. दादांनी या योजनेचे महत्त्व आणि दूरगामी सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन अतिशय उत्स्फूर्तपणे यासाठी वित्तीय तरतूद केली. त्यामुळे राज्यातील लाखो माता-भगिनींना दरमहा हक्काचा मासिक आधार मिळत आहे. या योजनेमुळे अजितदादांचे काम होते. सुरुवातीला राज्यात ही योजना दोन महिन्यांमध्ये बंद होऊन जाईल, असे विरोधक म्हणत होते. बहिणींनी खात्यात आलेले पैसे लवकरात लवकर काढून घ्यावे, असेही सांगत होते. पण अडीच कोटी महिलांच्या खात्यात पाच महिन्यांचे पैसे निवडणुकीआधी जमा झाले होते. यासंदर्भात कुठलीही तक्रार नव्हती. आम्ही कुठल्याही गावात गेलो की सर्वांना पैसे मिळाले, असे सांगायचे. सगळे जण तिजोरी रिकामी असून पैसे कुठून येणार? असे म्हणत होते. अनेक लोक दिल्लीलाही शंका वाटायचे. पण अजितदादा हे भारतामध्ये सर्वात 'कंजूस' अर्थमंत्री होते. जे पैसे जिथे पोहोचायचे आहेत तिथे पोहोचवायचे काम अजितदादा अचूकपणे करत. यशस्वी अर्थमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द महाराष्ट्राला सदैव स्मरणात राहील.

दादांच्या अर्थमंत्री पदाच्या काळात महायुती सरकारने नैसर्गिक आपत्तीपोटी १५ हजार कोटी रुपये दिले. अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी दोन हजार कोटी दिले. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र राज्याची सरकारी नोकर भरती विविध कारणांनी अडकली होती. ही कोंडी दादांनी फोडली. राज्य सरकारने युवा कौशल्य प्रशिक्षण विद्यावेतन योजना, वृद्धांना तीर्थक्षेत्र योजनेंतर्गत वयोश्री योजना लागू केली. महिला बचत गटांना लखपती दीदी योजनेमध्ये रक्कम १० लाखांवरून २५ लाख केली. व्यवसाय करू इच्छिणाऱ्या महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्टार्टअप योजना बिनव्याजी सुरू केली. शेतकऱ्यांसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंत मोफत वीज, एक रुपयात पीकविमा, शेतकऱ्यांना अपघाती मृत्यूसाठी दोन लाखांची भरपाई विमा योजना, गाय दूधामध्ये लिटरला पाच रुपये अनुदान, मागेल त्याला सौरऊर्जा पंप, शेतकरी सन्मान योजना, कुटुंबाला तीन सिलेंडर मोफत अशा महत्त्वाकांक्षी योजना दादांच्या अर्थमंत्रीपदाच्या काळात राज्य सरकारने सुरू केल्या आणि आजही राज्यातील हजारो लाखो जण या योजनांचा लाभ घेत आहेत.

अर्थमंत्री म्हणून दादांनी महिला, युवक, शेतकरी, कामगार यांच्या उन्नतीसाठी त्यांनी अनेक सकारात्मक निर्णय घेतले. पण त्याचा गाजावाजा केला नाही.

तळागाळातील लोकांना आधार देऊन राज्याचा सर्वांगीण आर्थिक विकास करणे हे आपले कर्तव्य आहे, या हेतूने दादा कार्यरत असत. दादांच्या बोलण्यात नेहमी स्पष्टता असायची. वागण्यात खात्रीशीरपणा असायचा आणि कामाचा आग्रह सदैव दिसून येत असे. त्यांना अगदी छोट्या-छोट्या तपशीलांकडे लक्ष द्यायची सवय होती. प्रत्येक योजनेच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी वेळोवेळी प्रशासनाला खडसावून प्रश्न विचारले. त्यामुळे प्रशासनावर दादांचा आदरयुक्त वचक होता.

एक प्रसंग मला आवर्जून सांगावासा वाटतो. कोल्हापूर जिल्ह्याचा उपजिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडहिंग्लज शहराला प्रशासकीय इमारतीची फार मोठी गरज होती. परंतु, १९६० पासून जागेचा प्रश्न भिजत पडला होता. मध्यंतरी, मुंबईत मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा प्रश्न निकालात निघाला. गडहिंग्लज शहरात आजरा रस्त्यावर मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन विभागाची १२२ गुंठे जागा आहे. त्यापैकी ४७ गुंठे जागा पशुसंवर्धन विभागाला ठेवून उर्वरित ७५ गुंठे जागेवर प्रशासकीय भवन बांधकामाचे आरक्षण होते. मुंबईतील बैठकीत ही जागा प्रशासकीय भवनाच्या बांधकामासाठी देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. अशा अनेक विकासाभिमुख मुद्यांची, प्रश्नांची सोडवणूक दादांनी स्वतः लक्ष घालून केली.

क्रीडा, सहकार, शिक्षण, सामाजिक क्षेत्रातही अजितदादांनी आपली वेगळी छाप उमटवली. महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, कबड्डी असोसिएशन यांसारख्या संस्थांना त्यांनी नवसंजीवनी दिली. या खेळांमध्ये नव्या पिढीला संधी मिळावी, ग्रामीण भागातील युवक पुढे यावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांचे संवेदनशील मन अनेक प्रसंगी दिसून आले आहे. सामान्य माणसाच्या गरजा ओळखून त्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणे, एखाद्या गरीब, गरजू व्यक्तीच्या मदतीस धावून जाणे हा त्यांच्या स्वभावाचा एक भाग होता. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण झाल्या, जलसंपदा प्रकल्प उभे राहिले, सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना नेहमी प्राधान्य दिले. त्यामुळेच दादांच्या निधनाने महाराष्ट्रातील नागरिक, प्रशासन, उद्योग, व्यापारी वर्ग आणि शेतकरी वर्ग, महिला भगिनी, क्रीडापटू, लेखक, पत्रकार या सर्वांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. अनेकांच्या अश्रूंचा बांध फुटला. दादांविषयीची ही कणव, आपुलकी, माया दुर्मिळपणे राजकारणात पाहायला मिळते. अजितदादा लोकनेता होते. त्यांनी महाराष्ट्राला वळण दिले, जनतेच्या हितासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आणि महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या प्रगत बनवण्याचा ध्यास घेतला. त्या दिशेने वेगाने पावले टाकली; पण हा प्रवास अर्ध्यावर असतानाच नियतीने डाव साधला. कधीही भरून न येणारी पोकळी दादांच्या जाण्याने राजकारणात तयार झाली आहे. दादांविना महाराष्ट्राचे राजकारण नीरस होऊन जाईल.

- नामदार हसन मुश्रीफ

## आठवणीतील गोरगरिबाचा कैवारी स्वर्गीय अजित दादा पवार

श्री गणेशा जनसेवेचा करुनी
अ. खंडितपणे केली सेवा जनतेची
जी. वनात भले आले कितीही चढ उतार
त. त्परतेने प्रत्येक प्रसंगाला दिले उत्तर
दा. खवला अस्सल राजकीय बाणा क्षणोक्षणी
दा. दा नाव शोभे महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या ओठी
आ. कांक्षा तयांच्या होत्या भरपूर
शा. ही पद्धतीचा शोभे जनता दरबार
ता .तडीने प्रत्येक अर्ज लावी धसास
ई .श्रत *बारामती* नगराची राखण्यास
अ. खेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सेवेचा ध्यास
नं. तर बघू या शब्दावर त्यांचा कधीच नव्हता विश्वास
त. मा तयांनी कधीच नाही बाळगली टिकेची
रा. बतच राहिले सदोदित कार्यकर्त्यांच्या भल्यासाठी
व. कृत्व त्यांनी कधीच केले नाही ठरवून
प .र्वा केली नाही काय होईल त्याचे परिणाम
वा. दळी प्रसंग त्यांनी परतुनी लावले सहजासहजी
र. यतेच्या काळजात *दादा* नाव कोरले कायमस्मरणी
उपमुख्यमंत्री पदावर कार्य केले सहा वेळेस
जयंती दिनी स्वर्गीय अजित दादा पवार यांना विनम्र अभिवादन



**शब्दरचना :**
श्री. केशव शहादू सूर्यवंशी ( खंडाळकर )
ग्रामपंचायत अधिकारी गोलटगाव ग्राम संसद
पंचायत समिती . छत्रपती संभाजीनगर
9689659111

# अभ्यास, निर्णयक्षमता आणि विकासाचा ध्यास – देवेंद्रजींच्या नेतृत्वाचा माझा अनुभव

२२ जुलै हा महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस. या निमित्ताने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करताना त्यांच्या सहवासात काम करताना आलेल्या अनेक आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहतात. सार्वजनिक जीवनात अनेक नेत्यांसोबत काम करण्याची संधी मिळाली; मात्र अभ्यास, निर्णयक्षमता, कामाचा अफाट वेग आणि संकटातही शांत राहण्याची वृत्ती या गुणांमुळे देवेंद्रजी वेगळे ठरतात.

सन २०१४ मध्ये देवेंद्रजी मुख्यमंत्री झाल्यानंतर मी देशातील सर्वात मोठ्या बंदरांपैकी एक असलेल्या जेएनपीटीचा विश्वस्त (ट्रस्टी) होतो. त्या काळात जालना येथे ड्राय पोर्ट उभारण्याची मागणी मी आणि श्री. राम भोगले यांनी केली होती. या प्रकल्पामुळे मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळणार होती. आमची भूमिका समजून घेत तत्कालीन केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, अवघ्या काही काळात सुमारे २५० हेक्टर जमीन संपादित करून हा महत्त्वाचा निर्णय मार्गी लावण्यात आला. प्रशासनाकडून इतक्या वेगाने आणि परिणामकारक पद्धतीने निर्णय होताना मी प्रथमच अनुभवत होतो. आजही तो प्रसंग माझ्या स्मरणात ताजा आहे.

मुख्यमंत्री झाल्यानंतरच्या त्यांच्या पहिल्या जपान दौऱ्यात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. त्या दौऱ्यात त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीने मी अक्षरशः भारावून गेलो. विमानप्रवासादरम्यान अनेक उद्योगपती त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी उत्सुक होते. एकामागून एक उद्योगपती त्यांच्यासमोर आपले प्रश्न, कल्पना आणि प्रस्ताव मांडत होते. संपूर्ण रात्र जवळपास त्यांनी विश्रांती न घेता चर्चा केल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजताच्या बैठकीला मात्र ते आमच्या आधी



उपस्थित होते. त्यांचा कामाचा उत्साह, वेळेचे नियोजन आणि अफाट ऊर्जा पाहून प्रत्येकालाच आश्चर्य वाटत होते.

देवेंद्रजींचा आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे संकटाच्या काळातही संयम न सोडणे. राजकारणात अनेक प्रसंगी तणावाची परिस्थिती निर्माण होते; परंतु त्यांनी कधीही भावनेच्या भरात निर्णय घेतल्याचे मला जाणवले नाही. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या काळात राज्यात विविध प्रकारच्या चर्चा सुरू होत्या. अनेक तर्क-वितर्क लावले जात होते. त्या वेळी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून त्यांनी कोणतीही अनावश्यक प्रतिक्रिया न देता अत्यंत शांतपणे आणि संयमाने परिस्थिती हाताळली. त्यांच्या या भूमिकेचे सर्व स्तरांतून कौतुक झाले.

माझ्या अनुभवात देवेंद्रजींचा आणखी एक विशेष गुण म्हणजे प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास. कोणताही विषय त्यांच्या समोर आला की त्यामागील सर्व पैलू समजून घेतल्याशिवाय ते निर्णय घेत नाहीत. केवळ समस्या ऐकून न घेता त्यावर व्यवहार्य आणि दीर्घकालीन उपाय शोधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे प्रशासनातही त्यांच्या निर्णयांबाबत विश्वासाचे वातावरण निर्माण होते.

आज महाराष्ट्र देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या राज्यांपैकी एक आहे. उद्योग, पायाभूत सुविधा, द्रुतगती महामार्ग, बंदरे, गुंतवणूक, शिक्षण, आरोग्य आणि आधुनिक तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांमध्ये राज्याने मोठी झेप घेतली आहे. विकसित भारत २०४७ या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेशी सुसंगत असे विकसित महाराष्ट्राचे व्हिजन देवेंद्रजी सातत्याने मांडत आहेत. रेल्वे, रस्ते, लॉजिस्टिक्स, मेडिकल कॉलेजेस, औद्योगिक कॉरिडॉर आणि आधुनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून महाराष्ट्राला जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच भविष्यात राज्याला अधिक उंचीवर घेऊन जाईल, असा मला विश्वास आहे.

आज महाराष्ट्राच्या विकासात देवेंद्र फडणवीस यांचे योगदान महत्त्वाचे आहे. पद मोठे असते म्हणून नेता मोठा होत नाही; तर दूरदृष्टी, अभ्यास, निर्णयक्षमता, कार्यतत्परता आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यामुळे नेतृत्व मोठे ठरते. या सर्व गुणांचा सुंदर संगम देवेंद्रजींच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

मा. देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना निरोगी, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विकासाच्या नव्या शिखरांकडे वाटचाल करत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

– विवेक देशपांडे
चेअरमन, रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. छत्रपती संभाजीनगर

# "कर्तव्यनिष्ठ अधिकारी समाजाचा आधारस्तंभ"

प्रशासनात कार्यरत असलेला अधिकारी आपल्या कर्तव्याप्रती कर्तव्यनिष्ठ असणे समाजासाठी नितांत गरजेचे आहे. कारण अधिकारी हा प्रशासन-सरकार आणि जनता यांच्यात समन्वय साधणारा महत्त्वपूर्ण दुवा अथवा आधारस्तंभ असतो.पुरोगामी परंपरा असलेल्या राकट व कणखर महाराष्ट्राला एकापेक्षा एक सरस अधिकाऱ्यांची परंपरा लाभली आहे. जनतेच्या मुलभूत व अत्यावश्यक कामांची पुर्तता करण्यासाठी कटिबद्ध असलेले अधिकारी यासाठीच लोकप्रिय ठरतात.महाराष्ट्रात अशा अधिकाऱ्याकडून लोकाभिमुख तसेच कर्तव्यनिष्ठ बाण्याने कामे झाल्यावर नागरिकांनी त्यांना डोक्यावर घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत. सध्या गाजत असलेले अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे ज्या खात्यात गेले तेथे त्यांनी सर्व प्रकारची दडपणे झुगारून केलेला कर्तव्यनिष्ठ कारभार याचे बोलके उदाहरण आहे.

समाजात अधिकारी म्हणजे नियमांवर बोट ठेवून काम करणारा,कायद्याच्या चौकटीत राहणारा असाच ठाम समज असल्याने असंख्य नागरिकांची महत्वाची कामे नियमांच्या चौकटीत अडकून राहतात,पण यावर यशस्वीपणे तोडगा काढत जनतेचे समाधान करत शासकीय योजनांचा लाभ गरजूंच्या पोहोचविण्यात यशस्वी ठरलेले अधिकारी लोकांच्या गळ्यातील ताईत बनतात.

महाराष्ट्रातील प्रशासनातील विविध क्षेत्रातील अधिकार्यांनी असा अभिनव व अभिमानास्पद पायंडा सुरु करत गतिमान, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन चालवत जनताभिमुख कारभार केल्याची उदाहरणे आहेत. शासकीय सेवा,पोलीस प्रशासनातील दलदलीतून जनता आणि त्यांची कामे हे परमकर्तव्य समोर ठेवून हे अधिकारी यशस्वी राहीले आहेत.

जेव्हा एखादी व्यक्ती उच्चशिक्षण घेऊन अधिकारी पदावर पोहोचते तेव्हा तिने पदभार स्विकारलेल्या ठिकाणी लोकांकडून आपले प्रश्न सोडविले जावेत अशी रास्त अपेक्षा असते.जनतेच्या वैयक्तिक,कौटुंबिक अर्थातच प्रशासनाशी निगडित प्रश्नांसह विकासाभिमुख कारभाराची पूर्तता होणे रास्तच आहे.

अधिकारी अशी कामे करताना सर्वात मोठा अडसर असतो राजकीय दबाव. तो झुगारून पुढे वाटचाल करणारा "साहेब " सिंघम" ठरतो. मनपा,महसूल आणि पोलीस खात्यात सेवा बजावण्यार्या अधिकाऱ्यांवर दबाव झुगारून जनतेला न्याय मिळवून देणे मोठी कसोटीच असते. म्हणूनच काम करणार्या अधिकाऱ्यांवर सतत बदलीची टांगती तलवार असते.

अलिकडे सेवानिवृत्त विभागीय व मनपा आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर तर तत्पूर्वी दिलीप बंड,पोलीस खात्यात रवींद्रकुमार सिंघल, जी.श्रीकांत अशा अधिकाऱ्यांची नावे बोलकी आहेत,त्यांनी प्रशासकीय चौकट ओलांडून केलेला जनताभिमुख कारभार उल्लेखनीयच आहे.

प्रशासनातील कारभाराची व्यापकता लक्षात घेऊन अधिकारी आपल्या खात्याचे कामकाज बेडरपणे करतो,त्याच्या यशाचा आलेख उंचावत जातो.

"सरकारी काम सहा महिने थांब " चिरीमीरीच काय वजन ठेवल्याशिवाय आपली फाईल पुढे सरकू शकणार नाही, हा ठाम समज बहुसंख्य अधिकाऱ्याकडून गडद झाल्याने समाजात एकीकडे आदर्श आणि कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याची प्रतिमा धूसर झाली आहे,अशा दोलायमान अवस्थेत तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी आशादायक वाटतात,म्हणूनच आमदार,खासदार फोडाफोडी आणि त्यांच्या पक्षांतराचे भाव जनतेचे डोळे पांढरे होण्याच्या काळात "तुकाराम मुंढे" यांना काही काळ मुख्यमंत्री करा" अशी वैफल्यग्रस्त मागणी सुप्तपणे जनतेतूनच ऐकली जाते.

अधिकारी हा प्रशासनातील सर्वोच्च स्थानी असतो,आपले कर्तव्य निभावण्यासाठीच त्याची नियुक्ती झालेली असते व या सर्वोच्च कामासाठी त्यास तगडे वेतन,सेवानिवृत्तीनंतर भरघोस लाभ मिळतो.परंतू दुर्दैवाने "साहेब " होणे म्हणजे कुबेराची खाण समजून अनेक अधिकाऱ्यांचे हात हरामाच्या धनाला शिवशिवतात. सेवानिवृत्तीपर्यंत लाखोच नाही कोट्यावधी संपत्ती जमा करुन प्रशासन,देशाशी प्रतारणा करत जनतेचा व हरामाचा पैसा जमा करत राजविलास भोगणारे अधिकारी व त्यांना मिळत असलेली राजकीय छाया या देशाचे दुर्दैवच आहे. म्हणून भ्रष्टाचारमुक्त,जनताभिमुख प्रशासन यांच्याशी प्रतारणा करणारा प्रशासनाचा सेवक नसून गोरगरीब,जनता यांचे आर्थिक,मानसिक शोषण करणारा राक्षसच आहे.

राष्ट्रीय स्तरावर तत्कालीन निवडणूक आयुक्त कै.टी.एन.शेषन यांनी भारतीय निवडणूक यंत्रणेतील त्रुटी दूर करत अमुलाग्र बदल केले तेव्हा शेषन राष्ट्रपती झाले पाहिजेत! अशीच भावना जनमानसात निर्माण झाली होती तर दिल्लीतील तिहार कारागृहात किरण बेदी यांनी बंदिवानांसाठी राबविलेल्या योजना समाजात गौरविण्यात आल्या. प्रशासनातील क्षेत्र कोणतेही असो जो अधिकारी आपली कर्तव्यनिष्ठा ईमानाने राबवतो,तो शासन,जनता यांचा लाडकाच बनतो. भारत हा जगातील सर्वाच्च लोकशाही देश आहे तसेच आपली भूमी म्हणजे विकसनशील राष्ट्र. अर्थात नोकरशाही उर्फ Buroc-racts बद्दल जी नोकरशाहीची भावना जनतेमध्ये पारंपरिक पद्धतीने कायम आहे,ती दूर करण्यासाठी कर्तव्यनिष्ठ अधिकारी बनून समाजाचा आधारस्तंभ होणे प्रशासनातील असलेल्या व येणार्यांसाठी सर्वाच्च साधनसुचिता आहे. लोकप्रशासनात अधिकारी होण्याचे धडे गिरवलेल्या या सेवकांनी अशा कर्तव्यनिष्ठतेचेच पाईक होणे उज्वल समाज,चारित्र्यवान अधिकारी ही प्रतिमा अधोरेखित होण्यासाठी नितांत गरजेचे आहे.

**- द्वारा- सतीश पुरुषोत्तम अन्वेकर**

## शुद्ध देशी गोवंश जतन आणि गो संवर्धन दिन निमित्य फिरत्या गोमातेचे पूजन सोहळा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी:**गौरक्षक सेना -स्व छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने शुद्ध देशी गोवंश जतन गोसंवर्धन 22 जुलै 2026 च्या निमित्ताने गोमातेच्या गोमातेचे मूर्ती प्रतिमेचे पूजन सोहळा सप्तशृंगी पान मंदिर वसमत रोड परभणी शहर होणार आहे परभणी जिल्ह्यातील गोमाता राज्यमाता गोमाता गोसंवर्धन गोसेवा क्षेत्रात कार्य करणारे गोसेवक गौरक्षक गोपालक गो उत्पादक गोउद्योजक गो व्यापारी गो गुत्तेदार गो अध्यक्ष गो संचालक गो सेक्रेटरी गो प्रचारक गो संघटना गो शाळा संघटना गोशाळा गो पोलीस मित्र गो शेतकरी गो पशुवैद्यकीय अधिकारी गो पशु सेवक गो प्राणी पशु डॉक्टर गो मित्र गो प्रेमी गो भक्त गो संवर्धन गो सन्मान गो अभिमान तरी जास्तीत जास्त संख्येने बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आव्हान गौरक्षक सेना मराठवाडा अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर श्री श्री १००८महामंडलेश्वर सचितानंदसरस्वती महाराज स्वामी पवार वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष गो योगगुरु चंपालाल देवतवाल ठाकूर गो प्रचारक भागवत बोबडे पैलवान यांच्यावतीने फिरत्या गोमातेचे व प्रतिमेचे मूर्तीचे पूजन करण्यात येणार आहे जय गोमाता जय भारत माता सुद्धा देशी गोवंश जतन गोसंवर्धन दिन की जय हो अशी माहिती कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी चे अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

## देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त म्हैसमाळ खुलताबाद रस्त्याच्या कामाचे आ. प्रशांत बंब यांच्या हस्ते भूमिपूजन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता




**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गंगापूर खुलताबाद तालुक्यातील विविध विकास कामाचे भूमिपूजन होणार असून यात खुलताबाद तालुक्यातील पर्यटन स्थळ म्हणून ओळख असलेले मिनी महाबळेश्वर असलेल्या.व धार्मिकदृष्ट्या मराठवाड्याची कुलदैवत म्हणून गिरजा देवी. बालाजी मंदिर दर्शनासाठी या ठिकाणी भाविकांची नेहमी मोठी गर्दी असते. म्हैसमाळ खुलताबाद रस्त्याचे अनेक दिवसापासून रखडलेल्या कामा साठी ८ कोटी २३ लाख रुपये मंजूर झाल्या असून कामाचे भूमिपूजन गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते होणार आहे आ बंब यांच्या प्रयत्नातून या कामास मंजुरी मिळाली असून या कामाचा शुभारंभ बुधवार दि २२ जुलै रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे या कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे पंचायत समितीच्या सभापती सुनिता संजय खंडागळे . तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग बांधवांसाठी तपासणी व आरोग्य शिबिर



**सावळदबारा प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोयगाव तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ जुलै रोजी उपजिल्हा रुग्णालय सोयगाव येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, दिव्यांगांची तपासणी करून जागेवरच प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. तसेच नूतनीकरण, आरोग्य तपासणी आणि आयुष्मान भारत कार्ड वाटप करण्यात येणार आहे.

हे शिबिर भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी आयोजित केले आहे. दि. २० जुलै रोजी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सावळदबारा, नांदातांडा, घाणेगाव, मोलखेडा, महालब्धा, हिवरी, पिंपळवाडी, रवळा, जवळा, जामठी, डाभा,सावळदबारा सह परिसरातील आदी गावांना भेटी देऊन नागरिकांना शिबिराची माहिती दिली. दिव्यांग बांधवांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी केले आहे.



**जिंतूर - व्हॉईस ऑफ मिडियाच्या जिंतूर तालुका अध्यक्ष पदी सचिन रायपत्रीवार यांची नियुक्ती झाल्या बद्दल भाजपा च्या वतीने सत्कार करण्यात आला त्यावेळी भाजप जिल्हा संघटक डॉ पंडित दराडे, शहर मंडळाध्यक्ष विलास भंडारी उपाध्यक्ष राजेश राठोड, रमेश संगेकर, विजय जाधव, ताठे आदी उपस्थित होते.**

# बालविवाह व नशामुक्त अभियानाची दिमाखदार सुरुवात

## विद्यार्थ्यांच्या जनजागरण रॅलीतून समाजाला दिला परिवर्तनाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर आणि श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह निर्मूलन व नशामुक्त अभियानाची उत्साहात सुरुवात करण्यात आली. श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या प्रांगणातून विद्यार्थ्यांनी काढलेल्या प्रभात फेरी व जनजागृती रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. १३ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत जिल्हाभर हे अभियान राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, बालविवाह प्रतिबंध आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा त्यामागील उद्देश आहे.

अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एस. मिन्नू, माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. रश्मी बोरीकर, उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे, दीपाली थावरे, दिलीप शिरसाठ, शिक्षण विस्तार अधिकारी जयेश चवरे, महिला व बालकल्याण अधिकारी कोमल कोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश मरकर आणि प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी हातात जनजागृतीपर फलक घेऊन विविध घोषणांद्वारे बालविवाहाला विरोध आणि व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला. मार्गदर्शन करताना पी. एस. मिन्नू यांनी सुदृढ समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प करावा, तसेच बालविवाह निर्मूलनासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. हे अभियान केवळ काही दिवसांचे नसून वर्षभर सातत्याने जनजागृती करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. डॉ. महेश मरकर यांनी व्यसनाचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितले. कोमल कोरे यांनी बालहक्कांचे संरक्षण, बालविवाह रोखण्यासाठी नागरिकांची भूमिका आणि गरज पडल्यास चाइल्ड हेल्पलाइनची मदत घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात शारदा मंदिर प्रशाला, इंदिराबाई पाठक महाविद्यालय आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या अभियानात श्री सरस्वती भुवन प्रशाला, शारदा मंदिर प्रशाला, श्री सरस्वती भुवन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आ. कृ. वाघमारे विद्यालय आणि शिशुविहार यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय गायकवाड यांनी केले. यावेळी सुनीता वाघ, सीमा सिद्दीकी, डॉ. संदीप चौधरी, अनुराधा पांडे, प्रा. एच. आर. चव्हाण यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात रॅगिंगविरोधी जनजागृती कार्यक्रम संपन्न

## रॅगिंग हा केवळ गैरप्रकार नसून कायद्याने दंडनीय गुन्हा : गजानन आरेकर

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



**सोयगाव,दि.२१ जुलै :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे नवागत विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित,सुसंवादी आणि रॅगिंगमुक्त शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने रॅगिंगविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार हे होते.प्रमुख अतिथी म्हणून सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी रॅगिंग हा केवळ गैरप्रकार नसून कायद्याने दंडनीय गुन्हा असल्याचे सांगत रॅगिंग प्रतिबंधक कायद्याची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी परस्परांशी सन्मानपूर्वक वागून महाविद्यालयात बंधुभाव,मैत्री आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ.आर.के. बारोटे उपस्थित होते.त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील रॅगिंग प्रतिबंधक समिती,तक्रार निवारण यंत्रणा तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महाविद्यालयाकडून करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शिस्त,परस्पर आदर आणि सामाजिक मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. "रॅगिंगमुक्त परिसर हेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे पहिले पाऊल आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.सुशील जावळे, डॉ.ज्योती स्वामी,डॉ. निलेश गाडेकर तसेच माधुरी लोंढे यांनी विशेष परिश्रम घेतले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रथम वर्ष व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी रॅगिंगमुक्त,सुरक्षित आणि सुसंस्कृत महाविद्यालयीन वातावरण निर्माण करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

"एकजूट,सन्मान आणि संस्कार-हाच आमचा आधार" हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली. तर यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी समाधान बारी,प्रियंका बोडखे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती स्वामी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.सुशील जावळे यांनी केले.

## अमराठी ऑटो-टॅक्सी चालकांसाठी मराठी प्रशिक्षण अनिवार्य; 15 ऑगस्टपर्यंत प्रमाणपत्र घ्या

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ आणि परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवाद भाषा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत परभणी जिल्ह्यातील अमराठी ऑटो रिक्षा व टॅक्सी परवाना धारक तसेच चालकांसाठी व्यावहारिक मराठी भाषा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण दि. २१ जुलै ते १४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत दररोज दुपारी ३.०० वाजता जिल्हा परिषद कन्या प्रशाला व उच्च माध्यमिक विद्यालय, स्टेशन रोड, परभणी येथे (खोली क्र. १) आयोजित करण्यात आले आहे. सर्व अमराठी ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रशिक्षण पूर्ण करून प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

दि. १६ ऑगस्ट २०२६ पासून परिवहन विभागाच्या तपासणीदरम्यान अमराठी ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांकडे हे प्रमाणपत्र नसल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यातील सर्व संबंधित चालक व परवाना धारकांनी या प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी होऊन मराठी संवाद कौशल्य विकसित करावे आणि वेळेत प्रमाणपत्र प्राप्त करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्याम कासार यांनी केले आहे.

## शाळेच्या आठवणींचा दरवळ अन् मैत्रीचा घट्ट बंध! बाल विद्या मंदिरच्या (1989 बॅच) मित्रांचा अजिंठ्यात हृदयस्पर्शी स्नेहमेळावा



***फर्दापूर (प्रतिनिधी):***

जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे आज मैत्री' हा आयुष्यातला असा एक ठेवा आहे, जो काळाच्या ओघात जुना न होता अधिकच बहरत जातो. शालेय जीवनातील तोच अल्लडपणा, तोच निरागस आनंद आणि तब्बल ३५-३७ वर्षांनंतरही न बदललेली मैत्रीची ओढ, याचा एक अत्यंत विलोभनीय आणि मनाला स्पर्श करणारा अनुभव नुकताच जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरात पाहायला मिळाला. निमित्त होते, परभणी येथील बाल विद्या मंदिर' (BVM) च्या १९८९ बॅचच्या माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या संस्मरणीय स्नेहमेळाव्याचे!

***जुन्या आठवणींचा प्रवास अन् अजिंठ्याचे सौंदर्य:***

रविवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथील डी-मार्ट येथून या सर्व जिवाभावाच्या मित्रांनी एकत्र प्रवासाला सुरुवात केली. गाडीत बसल्यापासूनच एकमेकांची ओढ आणि जुन्या आठवणींचा खजिना उघडला गेला. जागतिक वारसा असलेल्या अजिंठा लेणींच्या विहंगम सौंदर्याचा या सर्वांनी मनसोक्त आनंद लुटला. पायऱ्या चढत ऐतिहासिक लेणी परिसरात प्रवेश करताना, जणू हे सर्व जण पुन्हा एकदा शाळेच्या पायऱ्या चढत असल्याचा भास होत होता. अजिंठ्याच्या समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक व कलात्मक वारशाची माहिती जाणून घेतल्यानंतर, ग्रुप फोटो आणि हास्यविनोदात रंगलेले 'फोटोसेशन' त्यांच्या या अतूट मैत्रीचे नवे साक्षीदार ठरले.

***पंगतीचा आनंद आणि मनमोकळ्या गप्पा:***

लेणी दर्शन आणि जुन्या आठवणींनी भारावून गेलेल्या या मित्रांनी फर्दापूर येथील गेस्ट हाऊसमध्ये अल्प विश्रांती घेतली. त्यानंतर 'गोपालकृष्ण शुद्ध शाकाहारी हॉटेल'मध्ये सर्वांनी एकत्र पंगतीला बसून सामूहिक भोजनाचा मनमुराद आनंद घेतला. कुणी कुणाला चिडवत होतं, तर कुणी एकमेकांच्या सुख-दुःखाची आपुलकीने विचारपूस करत होतं. या गप्पांमध्ये प्रत्येकाचे वय जणू पुन्हा एकदा शाळेत गेल्यासारखे कमी झाले होते.

> ***सामाजिक बांधिलकीचा सुंदर वसा:***

> या स्नेहमेळाव्याचे सर्वात सुंदर आणि विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे फर्दापूर येथील राजकुंवर विद्यालयात त्यांनी राबवलेला 'वृक्षारोपण उपक्रम'. केवळ स्वतःच्या आनंदापुरते मर्यादित न राहता, या मित्रांनी निसर्गाप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली. "एक झाड... एक श्वास... एक पाऊल हरित भविष्यासाठी" हा पर्यावरण संवर्धनाचा अतिशय मोलाचा संदेश त्यांनी या कृतीतून संपूर्ण समाजाला दिला.

****यांच्या उपस्थितीने मेळावा झाला संस्मरणीय:****

शाळेच्या या सुवर्ण आठवणी जगण्यासाठी व्यंकटेश कुलकर्णी, राजेश्वर राऊत, डॉ. गजानन कुलकर्णी, डॉ. सुनीता परिहार, अनुजा पाठक, डॉ. निता कदम, डॉ. प्रकाश नांदापूरकर, विशाल वट्टमवार, सुषमा राऊतमारे, प्रेमेंद्र भावसार, साईनाथ बोराळकर, अनिरुद्ध मैराळ, सिद्धेश फुलारी, वंदना जोशी, निलेश गिरगांवकर, प्रज्ञा कुलकर्णी, डॉ. सुप्रिया कुलकर्णी आणि साधना राऊत यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदविला.

## शिवसेना प्रणित जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेनेच्या मावळ लोकसभा क्षेत्राच्या उपाध्यक्ष पदी जगदीश ठाकूर



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** शिवसेना प्रणित जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेनेच्या मावळ लोकसभा क्षेत्राच्या "उपाध्यक्ष" या महत्त्वपूर्ण पदावर जगदीश ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ही नियुक्ती मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे यांच्या आदेशाने करण्यात आली असून, मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या सहकार्याने ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच संघटनेचे अध्यक्ष डेव्हिड जेरी आणि उपाध्यक्ष राजा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

जगदीश ठाकूर हे संघटनात्मक कामात सक्रिय, मेहनती आणि कामगारांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या निवडीमुळे मावळ लोकसभा क्षेत्रातील माथाडी आणि सर्वसाधारण कामगारांना एक सक्षम, तत्पर आणि लढाऊ नेतृत्व मिळाले आहे. कामगारांचे हक्क, त्यांच्या समस्या आणि कल्याणासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत.

या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून जगदीश ठाकूर हे संघटनेला अधिक बळकट करतील, कामगारांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवतील आणि त्यांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. संघटनेच्या उद्दिष्टांची पूर्तता करताना ते सर्व स्तरांवरील कामगारांना एकत्र आणून त्यांच्यासाठी नवे उपक्रम राबवतील, अशी अपेक्षा आहे.

या नियुक्तीबद्दल जगदीश ठाकूर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून विविध क्षेत्रातून तसेच सर्वच स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पुढील कार्यकाळासाठी त्यांना सर्वांनीच हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## जय गजानन!!गण गण गणात बोते!! जय गजानन!! च्या जयघोषात सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव व लिहाखेडी येथून शेगाव कडे पायी दिंडी रवाना



**गोळेगाव :** आषाढी एकादशी निमित्त सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव खुर्द व लिहाखेडी येथून सालाबादप्रमाणे शेगाव पायी दिंडी या वर्षी ही अखंडित परंपरा कायम ठेवून 38 वर्ष पायी दिंडी मंगळवार (दि.21) सकाळी गोळेगाव ते शेगाव कडे रवाना झाली.

दिंडीत कोणीच कोणाला नावाने हाक मारत नाही. 'माऊली, माऊली' हाच एकमेव संवाद असतो. इथे नाव, पद, जात पात, भाषा, प्रांत काहीच लागत नाही. सगळे समान, सगळे भक्त. 'माऊली' म्हणणं ही आपल्या भक्तीची खरी अभिव्यक्ती आहे

आषाढी एकादशी निमित्त तालुक्यातील गोळेगाव व लिहाखेडी येथील भाविक दरवर्षी शेगाव येथे पायी जातात.38 वर्षापासून ही परंपरा कायम असून या वर्षी ही पायी दिंडी गण गण गणात बोते,जय गजानन या जयघोषात मंगळवारी रवाना झाली आहे.यात सुनील जयस्वाल , दादाराव बनकर,

जिल्हा परिषद सदस्य गणेश किसनराव बनकर,समाधान वराडे,आकाश बनकर,,भाऊसाहेब बनकर, पत्रकार अरविंद मुरकुटे,योगेश बनकर, करण बनकर,मनोज बनकर, ,योगेश नवल, विजय जयस्वाल ,

.ज्ञानेश्वर सोने.पवन बनकर,मनोज बनकर,सुनील जयस्वाल,,हरिदास बनकर, कृष्णा बनकर . सुरेश बनकर, रमेश दांडगे, मनोज दांडगे आदी भाविक पायी दिंडीने शेगाव कडे रवाना झाले आहेत. या प्रसंगी दिंडीला प्रस्तान करण्यापूर्वी गोळेगांव चे सरपंच गणेश बनकर पोलिस पाटिल अरुण बनकर सुधाकर बनकर .गणेश गव्हाणे आदिनी स्वागत करूॅंन दिंडीला मारगस्त केले


## गिरीस्थान नगरपरिषद खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर

Email ID:-khultabadcomc@gmail.com Telephone No : ०२४३७ २४१०७२

जा.क्र. 2026/नपख/कावि/१३०२ दिनांक. 21/07/2026

### जाहीर सूचना

या जाहिर सुचनेद्वारे खुलताबाद शहरातील सर्व डुकरे पाळणाऱ्या मालकांना कळविण्यात येते की, खुलताबाद शहरामध्ये मोकाट डुकरे यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढलेला असून त्यामुळे सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, वाहतुकीस अडथळा तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, 1965 मधील कलम २९४ डुकरे पाळण्यासंबंधी मधील तरतुदींनुसार नगरपरिषदेस प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खालीलप्रमाणे जाहीर सूचना देण्यात येत आहे.

1. शहरातील कोणत्याही व्यक्तीने डुकरे मोकाट सोडू नयेत.
2. डुकरे पाळणाऱ्या सर्व मालकांनी आपल्या डुकरांची योग्य ती व्यवस्था करून ती बंदिस्त ठिकाणी ठेवावीत.
3. सार्वजनिक रस्ते, नाले, मोकळी मैदाने, सार्वजनिक ठिकाणे अथवा नगरपरिषद हद्दीतील कोणत्याही ठिकाणी डुकरे मोकाट फिरताना आढळल्यास कलम २९४ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.
4. जप्त केलेल्या डुकरांबाबत लागू नियमांनुसार दंड, शुल्क व इतर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. आवश्यकतेनुसार संबंधित मालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत सर्व डुकरे मालकांनी आपल्या डुकरांची योग्य व्यवस्था करावी. त्यानंतर नगरपरिषदेमार्फत विशेष मोहीम राबवून मोकाट डुकरांवर कारवाई करण्यात येईल. यासाठी होणाऱ्या सर्व खर्चाची व कायदेशीर परिणामांची जबाबदारी संबंधित डुकरे मालकांची राहील.

सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी खुलताबाद शहराच्या निर्मितीसाठी नगरपरिषदेस सहकार्य करावे.

(स्वाक्षरीत/-)
मुख्याधिकारी
गिरीस्थान नगरपरिषद खुलताबाद

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# वेरूळ रस्त्याअभावी शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू; प्रशासनासह लोकप्रतिनिधीचेही दुर्लक्ष महिनाभरातील दुसरी घटना

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी



**खुलताबाद** : वेरूळ गाव पर्यटन क्षेत्र म्हणून जगाच्या नकाशावर नावाजलेले असून गावाच्या आजूबाजूची परिस्थिती विकासात्मक बाब म्हणून अत्यंत बिकट आहे यात स्थानिक लोकप्रतिनिधीचे अक्षयमय दुर्लक्ष असल्याचे दिसून येते.

वेरूळ शिवारातील इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या मागील बाजूस असलेल्या काळे वस्तीवरील शेतकरी सखाराम किसन जाधव यांचा वेळेत वैद्यकीय उपचार न मिळाल्याने रविवारी (दि. १९ जुलै २०२६) दुपारच्या सुमारास दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सखाराम जाधव हे आपल्या कुटुंबासह काळे वस्ती परिसरातील शेतात वास्तव्यास होते. अनेक वर्षांपासून या भागात सर्व हंगामात वाहतुकीयोग्य रस्ता नसल्याने येथील शेतकरी व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रविवारी त्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने कुटुंबीयांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावली. मात्र रस्ता नसल्याने ॲम्बुलन्स घटनास्थळी पोहोचू शकली नाही. अखेर त्यांना बैलगाडीतून सुमारे दोन किलोमीटर अंतरापर्यंत आणण्यात आले. मात्र या विलंबातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ही पहिली घटना नाही. सुमारे महिनाभरापूर्वीही अशाच परिस्थितीत एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून तातडीने कायमस्वरूपी रस्ता करण्याची मागणी होत आहे.

रस्ता नसल्याने नागरिकांचे हाल

- शेतकऱ्यांना पिकवलेला शेतमाल वेळेवर बाजारपेठेत नेता येत नाही. - गर्भवती महिला, वृद्ध नागरिक व गंभीर रुग्णांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळत नाहीत. - रुग्णवाहिका वस्तीपर्यंत पोहोचू शकत नाही. - शाळकरी विद्यार्थ्यांना चिखल व कच्च्या रस्त्यावरून जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागते. - शेतकरी, शेतमजूर व महिलांना दैनंदिन कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. - पावसाळ्यात संपूर्ण वस्तीचा संपर्क तुटण्याची वेळ येते.

काळे वस्तीवरील नागरिकांनी तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने सर्व हंगामात वाहतुकीयोग्य रस्ता मंजूर करून काम सुरू करण्याची मागणी केली असून, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

"माझ्या वडिलांची प्रकृती अचानक बिघडली. आम्ही तातडीने ॲम्बुलन्सला फोन केला, पण रस्ता नसल्यामुळे ॲम्बुलन्स आमच्या शेतापर्यंत पोहोचू शकली नाही. नाईलाजाने बैलगाडीतून त्यांना बाहेर आणावे लागले. जर रस्ता असता तर माझ्या वडिलांचा जीव वाचला असता. आम्हाला कोणतीही मदत नको, पण या भागातील शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी रस्ता करून द्या. आमच्या कुटुंबासारखी वेळ दुसऱ्या कोणावरही येऊ नये."


बाळू सखाराम जाधव
(मृत शेतकरी सखाराम जाधव यांचे पुत्र)

"आम्ही अनेक वर्षांपासून रस्त्याची मागणी करत आहोत. पावसाळ्यात शेतात जाणेही कठीण होते. शेतमाल बाजारात नेता येत नाही. गर्भवती महिला, वृद्ध, लहान मुले आणि आजारी रुग्णांचे प्रचंड हाल होतात. विद्यार्थ्यांना रोज जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागते. दोन शेतकऱ्यांचे जीव गेल्यानंतरही प्रशासन जागे होत नसेल, तर यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते?"

वाल्मीक काळे (शेतकरी, काळे वस्ती)

"हा केवळ एका शेतकऱ्याचा मृत्यू नाही, तर ग्रामीण भागाकडे झालेल्या प्रशासनाच्या दुर्लक्षाचा परिणाम आहे. रस्त्याअभावी दोन शेतकऱ्यांचे जीव गेले, तरी प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. आज शेतकरी शेतमाल विकू शकत नाही, विद्यार्थ्यांना शाळेत जाता येत नाही, गर्भवती महिला आणि वृद्धांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. नागरिकांना अजून किती जीव गमवावे लागणार? प्रशासनाने तातडीने रस्ता मंजूर करून काम सुरू करावे; अन्यथा शेतकरी, ग्रामस्थ आणि सामाजिक संघटनांसह तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल."

-सामाजिक कार्यकर्ते सतीश लोखंडे



भर पावसात शाळकरी विद्यार्थ्यांना बसमध्ये प्रवेश नाकारला? संतप्त विद्यार्थ्यांनी थेट बससमोर आडवे होत व्यक्त केला संताप! पाचोड बसस्थानकातील या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. रोज शिक्षणासाठी प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची अशी हेळसांड योग्य आहे का? असा व्हिडिओ व्हायरल होत आहे.

## स्मार्ट मीटर बसवणाऱ्या मुख्य गुत्तदाराने छोट्या गुत्तेदाराचे फसवणूक

### न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल

हिंदू प्रकाश वार्ता प्रतीनिधी.

**परभणी:-** स्मार्ट बसवण्याचे काम महावितरण कंपनीने सुरू केले असल्याने तीन जिल्ह्याचे स्मार्ट मीटर रिप्लेसमेंट तसेच पोल वरील मीटर बॉक्स बसवण्याचे काम करारानुसार दहा लाखांपैकी पाच लाख रुपये रोख रक्कम घेऊनही काम दिले नाही लक्षात आल्यावर याबाबत न्यायालयात दाद मागण्यात आली न्यायालयाच्या आदेशाने सदर प्रकरणातील 18 जुलै रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

या प्रकरणाची अधिक माहिती अशी की ही तक्रार दिली असून या फिर्यादीचा तिरुमला मल्टी सर्विस या नावाने व्यवसाय आहे इलेक्ट्रिकल चे कॉन्टॅक्ट घेतात संबंधिताचे नातेवाईका मार्फत ड्रीम ग्रुप कन्सेप्ट डीजीसी मार्फत अमान मुल्ला खान मुस्तफा खान यांच्यासोबत ओळख झाली संबंधित व्यक्तीने तीन जिल्ह्याचे स्मार्ट मीटर रिप्लेसमेंट तसेच फोनवरील मीटर बॉक्स बसवण्याचे काम मिळून देतो असे अमिष दाखवले व संबंधित फिर्यादीने संबंधितांना पाच लाख रुपये दिले रक्कम दिल्यानंतर काम देण्यात आले नाही दोन महिने उठून गेल्यानंतर फिर्यादीने पैसे मागितले यावर संबंधित व्यक्तीने उडवा उडी ची उत्तरे दिली फिर्यादीने याबाबत कोतवाली पोलीस ठाणे व पोलीस अधीक्षक कार्यालय येथे तक्रार अर्ज दिला त्यानंतर न्यायालयात दात मागितली आरोपीने फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली व कराराप्रमाणे पैसे घेऊन कॉन्टॅक्ट दिले नाही तसेच पैसेही परत केले नाही या प्रकरणात न्यायालयाच्या आदेशाने ड्रीम ग्रुप कन्सेप्ट बीजेसी मार्फत अमानुल्ला खान मुस्तफा खान यांच्यावर कोतवारी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून पोलीस अधीक्षक अमलदार अधिक तपास करत आहेत

## खोपटा कोप्रोली चिरनेर रस्त्यांच्या समस्या घेऊन शिवसेनेची PWD ला धडक



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड** : ता. २०.०७.२०२६ रोजी सकाळी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण येथील कार्यालयात कार्यकारी उपअभियंता डी एम पाटील यांची उरण पंचायत समिति सदस्य कविता रूपेश पाटील, माजी सभापती विश्वास म्हात्रे, चिरनेर ग्रा पं. सरपंच भास्कर मोकल, शिवसेना तालुका उपसंघटक रूपेश पाटील, रोहिदास पाटील, युवानेता एड. पर्जन्य म्हात्रे, कलंबुसरे ग्रा. पं उपसरपंच गजानन गायकवाड, भार्गव पाटील आदीं शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले. तत्पूर्वी चर्चा करताना गोरख ठाकूर, रूपेश भगत, राजू म्हात्रे, नंदू पाटील आदी खोपटे ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी विविध समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आले.खोपटा कोप्रोली चिरनेर रस्त्यावरील खड्डे त्वरित भरणे , जुना खोपटा पुलाची दुरुस्ती कामाला गती देऊन वाहतुकीस खुला करणे, या रस्त्याला आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवणे अशा मागण्या करण्यात आल्या. याशिवाय खोपटा कोप्रोली कलंबुसरे चिरनेर येथील पाण्याचा नीट निचरा न होणाऱ्या मोऱ्यांची दुरुस्ती करणे, काही ठिकाणी नवीन छोटे पूल (बॉक्स कलवर्ट ) उभारणे आदिची मागणी केली. याबाबत नव नियुक्त उप कार्यकारी अभियंता डी एम पाटील यांनी तातडीने कार्यवाही करण्याबाबत विभागाला सूचना केल्या. मोऱ्यांच्या कामासाठी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करून कार्यवाही करण्याचे अभिवचन डी एम पाटील यांनी दिले आहे.

## मालगाडीच्या डब्यातून उष्ण वाफा निघाल्याने प्लॅटफॉर्मवर उडाला गोंधळ

### अग्निशामक दल तातडीने हजर; पूर्णा रेल्वे स्टेशन वरील घटना

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार



**परभणी:** पूर्णा रेल्वे स्थानकावर जंक्शन असल्यामुळे प्रवासी वाहतूक मालवाहतूक गाड्यांची मोठ्या प्रमाणात येजा असते नेहमी प्लॅटफॉर्मवर भरलेल्या मालगाड्या पूर्णा हुन परभणीकडे पूर्णा वरून नांदेड कडे पूर्णावरून अकोल्याकडे अशा तिन्ही मार्गाकडे कडे. मालगाड्याचीयेजा होत असते तसेच रविवारी सायंकाळी अंदाजे पाचच्या दरम्यान कोळसा वाहतूक करणारी एक मालगाडी पूर्णा स्थानकावर येऊन थांबली थांबल्यानंतर असे निदर्शनास आले की मालगाडीच्या एका डब्यातून उष्ण वाफेचा धूर निघत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर रेल्वे प्रशासन व नगरपरिषद अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे संभाव्य धोका टळला.

मिळालेल्या अधिक माहितीनुसार एक कोळसा वाहतूक करणारी मालगाडी रेल्वे स्थानकावर आली असता ड्युटीवर रुजू होणारे मालगाडीचे ट्रेन मॅनेजर सागर लोणारे हे नियमित तपासणी करत डब्याची पाहणी करत होते यावेळी ट्रेन मॅनेजरच्या डब्यापासून तिसऱ्या क्रमांकाच्या मालवाहू डब्यातून उष्ण वाफेचे फवारे निघत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले व संबंधित डबा हा असामान्य व्यक्ती गरम झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ स्टेशन मॅनेजर राजू भिसे साहेबांना माहिती दिली. रेल्वे प्रशासनाने पूर्ण नगरपरिषदचे अग्निशामक दलाला पाचारण केले अग्निशामक दलाने घटनास्थळी दाखल होत संबंधित डब्यावर उच्च दाबाने पाण्याचा मारा केला काही वेळातच डब्यातील उष्णता वाफ पूर्णपणे आटोक्यात आणण्यात आली या घटनेत कोणती जीवित हानी किंवा वित्तहानी झाली नसून ट्रेन मॅनेजरच्या सतरतेमुळे मोठा अनर्थ टळला या घटनेमुळे पूर्णा रेल्वे स्थानक परिसरात धावपळ उडाली ही मालगाडी पूर्ण येथून परळी मार्गे टी एस एन एच पर्यंत जाणार होती कारवाईत पथक प्रमुख गणेश रापतवार फायरमन सोनाजी खिल्लारे दीपक गवळी तनवीर कुरेशी तसेच अग्निशामक वाहन चालक अमजद कुरेशी यांनी तत्परतेने सहभाग घेत परिस्थिती नियंत्रणात आणली स्टेशन मॅनेजर राजू भिसे तत्परता दाखवत अग्निशन दलास पाचारण केले तसेच कर्तव्य बजावत असताना व त्या गाडीचे चार्ज घेत असताना पूर्व तपासणी करून घेणे योग्य आहे म्हणून ट्रेन मॅनेजर यांच्या सतर्कतेमुळे होणारा फार मोठा संभाव्य धोका कळला अशी चर्चा होत असून कर्तव्यात तत्परता दाखवल्याबद्दल राजू भिसे ट्रेन मॅनेजर सागर लोणार यांचे सर्व प्रवाशातून कौतुक केले जात आहे.

## तीन महिने व्हेंटिलेटरवर मृत्यूशी झुंज; घाटीतील उपचारांनी 32 वर्षीय तरुणाला नवजीवन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील मेडिसीन विभागाने वैद्यकीय सेवेतील आणखी एक उल्लेखनीय यश नोंदवले आहे. मुंबईहून परतल्यानंतर गंभीर अवस्थेत दाखल झालेल्या ३२ वर्षीय तरुणावर तब्बल तीन महिने अतिदक्षता विभागात उपचार करून त्याला सुखरूप घरी पाठविण्यात आले. ९ एप्रिल रोजी ताप, कमी रक्तदाब, बेशुद्धावस्था व हृदयविकाराच्या गंभीर लक्षणांसह दाखल झालेल्या रुग्णाला तातडीने व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. उपचारादरम्यान मेंदूत रक्तस्त्राव, फुफ्फुसाचा गंभीर संसर्ग आणि चेतासंस्थेचा संसर्ग अशा गुंतागुंती निर्माण झाल्या. मेडिसीन, न्यूरोसर्जरी, अतिदक्षता विभाग आणि नर्सिंग कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून औषधोपचार, रक्तघटक, ट्रॅकीओस्टॉमी व सतत निरीक्षणामुळे रुग्णाची प्रकृती सुधारली. ६ जुलै रोजी त्याला वॉर्डमध्ये हलविण्यात आले आणि २० जुलै रोजी डिस्चार्ज देण्यात आला. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रशांत गजभारे व मेडिसीन विभागाच्या पथकाने ही यशस्वी उपचार प्रक्रिया पूर्ण केली.

## एआयएफएफच्या 'राऊंड द इयर' उपक्रमाचा यशस्वी समारोप

### एमजीएम विद्यापीठात 'द ग्रेट इंडियन इल्यूजन', 'फड' आणि 'सीता की बेटी'चे प्रदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर, दि. २० :** मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशनतर्फे आयोजित अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या 'राऊंड द इयर' उपक्रमांतर्गत तीन दिवसीय माहितीपट महोत्सवाचा उत्साहात समारोप झाला. एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्समधील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात 'द ग्रेट इंडियन इल्यूजन', 'फड' आणि 'सीता की बेटी' या माहितीपटांचे प्रदर्शन करण्यात आले. या महोत्सवाला चित्रपटप्रेमी, विद्यार्थी आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

समारोप कार्यक्रमास दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ, निलेश राऊत, डॉ. आनंद निकाळजे, निना निकाळजे, डॉ. रेखा शेळके, डॉ. शिव कदम, प्रशांत पवार, प्रा. आशा देशपांडे, प्रा. जाई कदम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

समारोपाच्या दिवशी शिल्पा बल्लाळ दिग्दर्शित 'सीता की बेटी' या माहितीपटाचे प्रदर्शन झाले. भारतातील १६ राज्यांमध्ये चार वर्षांच्या कालावधीत चित्रीत झालेल्या या माहितीपटात विवाह संस्था, पुरुषसत्ताक मानसिकता, सामाजिक विषमता, परंपरा आणि महिलांच्या अनुभवांवर व्यंगात्मक शैलीत भाष्य करण्यात आले आहे. माहितीपटानंतर आयोजित संवाद सत्रात शिल्पा बल्लाळ यांनी निर्मिती प्रक्रियेतील अनुभव मांडताना, अन्यायग्रस्तांच्या वेदना पुन्हा उकरून काढू नयेत म्हणून पारंपरिक मुलाखती टाळल्याचे सांगितले. समाजातील विषमता दूर करण्यासाठी चिकित्सक विचार, सातत्यपूर्ण संवाद आणि महिलांच्या अनुभवांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा व्यापक प्रसार होणे आणि तरुणांनी समाजपरिवर्तनासाठी चिकित्सक दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमासाठी एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स तसेच कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया यांचे सहकार्य लाभले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ. अशिष गाडेकर यांनी आयोजक व सहभागींचे अभिनंदन केले.

## देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताहात महारक्तदान शिबिराला प्रतिसाद

### शहराध्यक्ष किशोर शितोळे यांनी केले रक्तदान



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महारक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत समाजाप्रती असलेली आपली सामाजिक बांधिलकी जपली.

या सेवाभावी उपक्रमात भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी स्वतः रक्तदान करून कार्यकर्ते आणि नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला. त्यांच्या रक्तदानामुळे उपस्थितांमध्येही रक्तदानाबाबत सकारात्मक संदेश गेला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदान हे सर्वोत्तम दान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असे सांगत समाजातील प्रत्येक नागरिकाने नियमितपणे रक्तदानासारख्या मानवतावादी उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

या प्रसंगी भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा उज्वलाताई दहिफळे, सरचिटणीस तथा नगरसेविका छायाताई खाजेकर, नगरसेविका कीर्तीताई शिंदे, नगरसेविका अमृताताई पालोदकर, माजी नगरसेवक बबनराव नरवडे, विशाल थोरात यांच्यासह महिला मोर्चाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एसटी चालक-वाहकाचा प्रामाणिकपणा ठरला आदर्श; बसमध्ये सापडलेले साडेपाच हजार रुपये केले वृद्धाला परत

### रोख रक्कम, औषधे व महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग सुरक्षित सुपूर्द; वृद्धाच्या डोळ्यांत आनंदाश्रू

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** आजच्या काळात आर्थिक फसवणूक आणि हरवलेल्या वस्तू परत मिळण्याच्या घटना दुर्मीळ होत चालल्या असताना, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) चालक आणि वाहकांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. बसमध्ये सापडलेली साडेपाच हजार रुपयांची रोख रक्कम, औषधे आणि महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग त्यांनी ८० वर्षीय वृद्धाला सुरक्षित परत करून माणुसकीचे दर्शन घडविले.

रविवार (१९ जुलै) रोजी सोलापूर–छत्रपती संभाजीनगर मार्गावरील बस (क्र. एमएच-२० बीएल-३२२५) मध्ये वाहक जी. व्ही. शिरमेवार (बॅज क्र. ३९६७२) आणि चालक बी. डी. दहिफळे (बॅज क्र. २०५३२) यांना एक बेवारस बॅग आढळली. त्यांनी तत्काळ ती बॅग संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केली.

एटीआय एस. एस. बेग आणि लोकेश जाधव यांनी बॅगची तपासणी केली असता, त्यामध्ये ५ हजार ६५३ रुपये रोख रक्कम, औषधे आणि रुग्णालयाशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे आढळून आली. चौकशीअंती ही बॅग ए. बी. देशमुख (वय ८०) यांची असल्याचे निष्पन्न झाले.

आवश्यक शहानिशा पूर्ण केल्यानंतर आगर व्यवस्थापक स्वाती घोडे यांच्या उपस्थितीत देशमुख यांना त्यांची बॅग आणि संपूर्ण साहित्य सुरक्षितपणे परत करण्यात आले. हरवलेली रक्कम आणि कागदपत्रे परत मिळाल्याने देशमुख यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. त्यांनी चालक-वाहक आणि एसटी प्रशासनाचे मनापासून आभार मानले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911